**तात्काळ/कालमर्यादा/महत्त्वाचे**

क्र.पोमसं/३१/३९-४/मोवाअ अग्रीम (२०२५-२६)/८२/२०२५ मुंबई, दि.२७/०३/२०२६

**विषय :- निधी वितरण २०२५ - २६**
मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष- "७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०२, मोटार वाहन अग्रिमाबाबत.

*********

**आदेश**

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.बीयुडी- ०६२५/प्र.क्र.७३/आस्था-१, दि.१८/०३/२०२६ अन्वये सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरीता शासनाने मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष-" ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०२, मोटार वाहन अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००९६) योजनेमध्ये रु.२२,००,०००/- (रुपये बावीस लाख फक्त ) इतका निधी शासनाने बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच शासन निर्णय दि.०३/१०/२०२५ अन्वये प्राप्त झालेल्या निधीपैकी शिल्लक रु.५९,७५४/- तसेच घटक कार्यालयांनी सर्मपित केलेला निधी रु.५,४२,३९९/- असा एकूण रु.२८,०२,१५३/- इतका निधी या कार्यालयाच्या बीडीएस प्रणालीवर वितरणाकरिता उपलब्ध आहे.

२. उपरोक्त शासन निर्णयानुसार शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या **२८,०२,१५३/- (अक्षरी रुपये अठ्ठावीस लाख दोन हजार एकशे त्रेपन्न फक्त)** एवढ्या निधीपैकी रु. २७,३२,०७१ /- (अक्षरी रुपये सत्तावीस लाख बत्तीस हजार एक्काहत्तर फक्त ) इतक्या निधीचे सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांना, मोटार सायकल/स्कूटर/मोपेड/सायकल खरेदीसाठी शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/ प्र.क्र.३३/२०२२ विनियम दि.०९/११/२०२३ मधील विहीत तरतूदी नुसार अग्रिम वाटप करावे.

३. तसेच नवीन किंवा जुनी मोटार कार खरेदीसाठी राजपत्रित राज्य शासकीय अधिका-यांना मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम-१३६ आणि वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १२ नियम १३६ मधील अटी तसेच शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३२/२०२२ विनियम दि.१७/१०/२०२३ मधील नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून मोटार कार अग्रिम वाटप करावे.

४. सोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्र.३ मध्ये नमुद विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/ २०१३ विनियम, दिनांक १७/०४/२०१५ अन्वये मुंबई वित्तिय नियम १९५९ मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १२ नियम १३६ मधील अटी तसेच शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२ विनियम दि.०९/११/२०२३ आणि शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३२/२०२२ विनियम दि.१७/१०/२०२३ मधील नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून मोटार वाहन अग्रिम मंजूरीचे आदेश निर्गमित करावेत.

५. **विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२ विनियम दि.०९/११/२०२३ आणि शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०२२/ प्र.क्र.३२/२०२२ विनियम दि.१७/१०/२०२३ मधील नमूद विहित केलेल्या अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच मोटार वाहन अग्रिमाचे मंजुरी आदेश निर्गमित करताना त्यामध्ये सदर शासन निर्णयातील अटी शर्तींचा स्पष्ट उल्लेख करावा :-**

६. अग्रिम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील नियम १२४ (बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम- १०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि. २६/०९/१९९७ मध्ये नमूद तसेच, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.

७. शासनाने, सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा विनियोग त्वरीत होणे आवश्यक आहे. सर्व घटक प्रमुखांना निर्देशित करण्यात येते की, देयके त्वरीत कोषागारात सादर करुन ती पारीत करुन घ्यावीत. तसेच अग्रिमाची रक्कम ज्या महिन्यात वितरीत केली असेल त्याच्या पुढील महिन्यापासून अग्रिमाच्या वसूलीस सुरुवात करावी.

८. सदर निधीचा विनियोग पुर्णत: न केल्यास किंवा तो व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात. तरी निर्देश देण्यात येत आहेत की, विभाग प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मोटार वाहन अग्रिम मंजूरी संबंधीचे आदेश त्वरीत निर्गमित करावेत. आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके त्वरीत पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्याला अग्रिम रक्कम अदा करणे ही सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन व या प्रकरणी वैयक्तीकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखा विषयक कामकाज हाताळणारे लेखा अधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी /लिपिक वर्गीय अधिकारी /कर्मचारी यांनी स्वत: लक्ष देऊन त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. संबंधीतांना अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्याची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक त्यांचे सेवापुस्तकात/ सेवापटात नोंद करावा आणि या कार्यालयास /शासनास व महालेखापाल-१,मुंबई /महालेखापाल-२, नागपूर/अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना तसा अहवाल त्वरीत सादर करावा.

९. असे निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी/ महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण-१४ नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. खर्च मेळयाची प्रमाणित माहिती महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील. उपलब्ध केलेला निधी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३, दि.१/०४/२०२४ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून खर्च करणे बंधनकारक राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

१०. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, खर्चमेळ्याची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारीही क्षेत्रीय विभागीय कार्यालय प्रमुखांची राहील व त्याप्रमाणे माहिती न पाठविणाऱ्या कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

११. सदरचा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०-शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०२ - मोटार वाहन अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००९६) अन्वये खर्ची टाकण्यात यावा व वित्तीय वर्ष २०२५-२६ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

(मोक्षदा पाटील)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), (अति. कार्य)
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रत सविनय सादर -

अपर मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, गृह विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,
मादामकामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२
(लक्षवेध:- कक्ष अधिकारी, आस्था - १)
महालेखापाल - १ मुंबई / महालेखाकार - २, नागपूर

| अ.क्र. | घटक | पोलीस अंमदार / अधिकारी यांचे नांवे | अनुदान |
|---|---|---|---|
| १. | पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर | पोशि/२०१७, मजहर जाफर शेख | १६१५६२ |
| २ | | पोशि/२७८६, ज्ञानेश्वर वसंत कोळी | १४२०५० |
| ३ | | पोशि/२८२६, फकिरा नब्बास तडवी | १४२०५० |
| ४ | | पोशि/२८२३, बंडु विश्वनाथ गोरे | १४२०५० |
| ५ | | कश्रेलि, रोहित गोविंदराव बरसाळे | १५०६६१ |
| ६ | | मपोशि/२७०७, मनिषा रमेश पवार | १४२४४९ |
| ७ | | पोशि/२७८१, संतोष कचरू कोकाटे | १६०००० |
| ८ | | पोशि/२६१८, योगेश मोतीलाल जाधव | १५५३२३ |
| ९ | | पोशि/२९३२, विजयकुमार दिंगबर पांडुरे | १३९४५९ |
| १० | | पोशि/२६५७, श्रीपाद दिनकर जाधव | १६०००० |
| ११ | | मपोशि/२३, वर्षा अशोक गोडबोले | ११७४०५ |
| १२ | | पोह/१८३८, रामकृष्ण शिवाजी आरदवाड | १६०००० |
| १३ | | पोशि/२५४९, प्रशांत आसाराम माळी | १५४०६२ |
| १४ | | कश्रेलि, हरीदास दत्तात्रय देवरे | १६०००० |
| १५ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | पोशि/६९, सुदर्शन रंगराव जाधव | १६५००० |
| १६ | | पोहवा/२००२, अतुल तांगडे | १६५००० |
| १७ | | पोशि/२०६२, तुषार सुकराज जाधव | १६५००० |
| १८ | | पोहवा/९५५, अमित मोहनलाल वर्मा | १५०००० |
| | एकूण | | २७,३२,०७१ |